CNR No. MHWR030021222026
सं.फौ.ख.क्र. ११९१/२०२६
शासन विरूध्द शुभम
निशाणी क्रमांक ०२

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (फौजदारी न्यायालय क्र. १), वर्धा यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी : विक्रांत प्र. खंदारे)

**गुन्हयाचा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १. अपराधाचा दिनांक | : | ३०/०१/२०२६ |
| २. फिर्याद दाखल दिनांक | : | ३०/०१/२०२६ |
| ३. फिर्यादीचे नाव | : | सरकारतर्फे पो.स्टे. अधिकारी, रामनगर, पोलीस स्टेशन, जि. वर्धा. |
| ४. आरोपीचे नाव | : | शुभम ईश्वर वाघाडे, वय : २६ वर्षे, धंदा : ड्रायव्हर, रा. खैरे कामठी, ता. जि. वर्धा. |
| ५. कायदयाचे नाव व कलम | : | भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ प्रमाणे. |
| ६. गुन्हयाचा तपशील | : | |

दिनांक ३०/०१/२०२६ रोजी संध्याकाळी ०५:१५ वाजताच्या सुमारास मौजा बस स्टॅण्ड समोर, वर्धा, ता. जि. वर्धा येथे सार्वजनिक रस्त्यावर तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन अवैधरित्या व इतरांना धोका होईल अशा स्थितीत उभे करून त्याव्दारे रहदारीस अडथळा निर्माण केला. त्यामुळे तुम्ही माझे अखत्यारीत भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

करीता तुमचेविरूध्द या न्यायालयात खटला चालविण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.05.09 13:34:54 +0530

दिनांक : ०९/०५/२०२६
ठिकाण : वर्धा.

(विक्रांत प्र. खंदारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

७. **आरोपीचे प्रतिवेदन**

प्रश्न क्र. १ : तुम्हाला सदर खटल्यामधील चालानाच्या नकला मिळाल्या का ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : तुम्हाला वाचून व समजावून सांगितलेला गुन्हयाचा तपशिल समजला काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. ४ : आता समजाविल्याप्रमाणे तुम्हाला गुन्हा कबूल केल्यास दंड होवू शकतो हे समजले काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. ५ : तुम्हाला तरीही गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : होय.

आरोपीची सही

__________

दिनांक : ०९/०५/२०२६

ठिकाण : वर्धा.

माझे समक्ष

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.05.09 13:35:01 +0530

(विक्रांत प्र. खंदारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

## आदेश

८. आरोपीविरूध्द गुन्हयाचा तपशिल ठेवतांना व त्याचे प्रतिकथन नोंदवितांना आरोपीने त्याला सदर गुन्हे कबुल असल्याचे निवेदन नोंदविले आहे. त्याबाबत त्याने पुरसिस सुध्दा दाखल केलेली आहे. आरोपी स्वमर्जीने व कोणत्याही दडपणाखाली न येता गुन्हा कबुल करीत असल्याची खात्री करून त्याचे गुन्हा कबुलीचे प्रतिकथन मान्य करण्यात येते. त्यानुसार आरोपीला सदर गुन्हयांकरीता दोषी ठरविण्यात येते.

९. विद्वान सहाय्यक सरकारी वकील, आरोपी व त्याचे विद्वान वकिल यांचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने निवेदन केले आहे की, हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे व तो त्याचे घरामध्ये एकटाच कमावता असून कुटूंबाची सर्वस्व जबाबदारी त्याच्यावर आहे. तसेच तो हलाखीचे जीवन जगत असून त्याला रोजगाराची आबाळ आहे. करीता त्याने कमीत कमी दंड आकारण्याची विनंती केली.

१०. आरोपीविरूध्द सिध्द गुन्हा साध्या स्वरूपाचा असून हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. परंतु असे असुनही रस्त्यावर वाहन उभे करून रहदारीला अडथळा निर्माण करणे ही गंभीर बाब असून त्यामुळे अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. अशावेळी आरोपीला शिक्षा न केल्यास त्याला या बाबीची जाणीव राहणार नाही व तो अशाच घटनांची पुनरावृत्ती करू शकतो. त्यामुळे आरोपीला शिक्षा देणे क्रमप्राप्त ठरते. करीता, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी शुभम ईश्वर वाघाडे, यास भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ या शिक्षापात्र गुन्हयांसाठी दोषी ठरविण्यात येवून त्याकरीता त्यास रूपये ५००/— द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने दंड रक्कम न भरल्यास ०१ दिवसाचा साधा कारावास भोगावा.

२. या आदेशाची एक प्रत आरोपीला विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.05.09 13:35:12 +0530

दिनांक : ०९/०५/२०२६

ठिकाण : वर्धा.

(विक्रांत प्र. खंदारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

प्रत विनामुल्य मिळाली
(आरोपीची सही) ..................